स.फौ.ख.क्र. ५५१ /२०१७
सरकार वि. रामदास आणि १
नि.क्र. ९

सरकारतर्फे साक्षदारर क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते कि
नाव – संगिता शिवशंकर मुळे,
वय – ३५ वर्ष, व्यवसाय – मोलमजूरी,
राह. – ढोलमारा, ता. मौदा, जिल्हा नागपुर.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा</u>**

**१.** मी आरोपीस ओळखते. मयत आरोपी नामे सदाशिव मुळे माझा भासरा होता. सदरची घटना अंदाजे ५–६ वर्षापूर्वी सायंकाळी ०६.०० च्या दरम्यान माझ्या घरी घडलेली आहे. प्लॉटच्या कारणावरून दोन्ही आरोपींनी माझ्या पती सोबत भांडण केले होते. आरोपींनी माझ्या पतीला मारहाण केली व आरोपीने माझ्या पती विरोधातच तक्रार दाखल केली होती. 'माझ्या प्लॉटवर येऊन तुम्ही माझ्याशी भांडण करता' असे आरोपीला म्हटले तेव्हा दोन्ही आरोपींनी माझ्या कानावर मारले. आरोपींनी माझ्या कानावर मारल्यामुळे मला कमी ऐकायला येत आहे. मी भंडा–याच्या दवाखाण्यात गेले होते. मी सदर घटनेची अरोली पो.स्टे येथे तक्रार दिली होती. आता मला मी अरोली पो.स्टे यांच्या कडे दिलेले तोडी बयाण दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. सदर तोंडी रिपोर्ट ला **नि.क्र.१०** देण्यात येत आहे. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. सदर प्रथम खबरी अहवालास **नि.क्र.११** देण्यात येत आहे. पोलीस चौकशीसाठी माझ्याकडे आले होते. आज रोजी आरोपी नामे रामदास करकाळे न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री एम.एच. राहांगडाले यांच्या द्वारे –**

२. मला वाचता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रिपोर्ट मधे काय लिहिले आहे हे मला पोलीसांनी वाचून दाखवले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सही करण्यास सांगितले त्यामुळे मी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, घराच्या कारणावरून आरोपी व

माझ्या परिवारामधे पूर्वीपासून वादविवाद आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व माझ्या मधे घराच्या कारणावरून वाद होते म्हणून मी आरोपीविरोधात खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही आरोपीने माझ्या पतीला किंवा मला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मारहाण केल्यामुळे माझ्या कानाला दुखापत झाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत.

**उलटतपास पूर्ण.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक २५.०८.२०२५

समक्ष

**स्वाक्षरी/–**

(एल.एम. पठाण)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा